**महाराष्ट्र शासन,**
**गृहनिर्माण विभाग,**
**औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,औरंगाबाद**
(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम-१९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) नियम-१९८१ आणि (मालमत्ता व्यवस्थापन गाळयाची विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम-१९८१ तसेच (भू-विनियोग) विनियम-१९८२ अन्वये व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणेच्या अधिन राहून **प्लॉट क्र.आर-७,एम.आय़ डी.सी.वाळूज, औरंगाबाद व भूखंड क्र. आर-१, एम.आय.डी.सी. ता. पैठण जि. औरंगाबाद** येथील खालीलप्रमाणे सदनिका **प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्याने अर्ज पात्रतेच्या सर्व अटी शिथील करुन एक रक्कमी खरेदी पध्दतीने** वाटप करण्यास्तव मागणी अजमवण्यासाठी पात्र अर्जदारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. **अर्जदार एकापेक्षा अधिक सदनिका घेऊ शकतो**. एम.आय.डी.सी. क्षेत्रात नोकरी वा व्यवसाय करणा-यांना प्राधान्य देण्यात येईल.

| **योजनेची चौथी जाहीरात** | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | विवरण | २५६ सदनिका, (२ बीएचके फ्लॅट) मध्यम उत्पन्न गट, प्लॉट क्र.आर-७, एम.आय़ डी.सी.वाळूज, औरंगाबाद. | १६० सदनिका (१बीएचके फ्लॅट)अल्प उत्पन्न गट,भूखंड क्र. आर-१, एम.आय.डी.सी. ता. पैठण जि. औरंगाबाद |
| ०१ | वाटपाची पध्दत | **प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य** | **प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य** |
| ०२ | वाटपास उपलब्ध असलेल्या सदनिकांची संख्या | २५६ पैकी २१५ सदनिका<br>सर्वसाधारण प्रवर्ग - १७२<br>अनुसूचित जाती - २३<br>अनुसूचित जमाती - १३<br>भटक्या जमाती - ०३<br>विमुक्त जाती - ०४ | १६० पैकी १३४ सदनिका.<br>सर्वसाधारण प्रवर्ग - १०६<br>अनुसूचित जाती - १५<br>अनुसूचित जमाती - १०<br>भटक्या जमाती - ०१<br>विमुक्त जाती - ०२ |
| ०३ | इमारत बांधकामाचे स्वरुप | आर् सी.सी.प्री.फॅब टेक्नॉलॉजीची इमारत (पार्कींग + चार मजले) | आर् सी.सी.प्री.फॅब टेक्नॉलॉजीची इमारत (तळमजला + तीन मजले) |
| ०४ | सदनिकेचा तपशील | एक बैठक खोली (बालकनीसह), दोन शयन कक्ष (एक शयनकक्ष ॲटॅच टॉयलेटसह), स्वयंपाकगृह (ड्राय बालकनीसह), एक स्वतंत्र टॉयलेट | एक बैठक खोली, एक शयन कक्ष, स्वयंपाकगृह, स्वच्छतागृह व शौचालय |
| ०५ | सुविधा | लिफ्ट सुविधा, प्रत्येक इमारतीसाठी प्रशस्त सोसायटी कार्यालय, प्रशस्त स्टेअरकेस लॉबी, मुबलक पार्कींग, वसाहतीमध्ये प्रशस्त गार्डनची व्यवस्था, कॉंक्रीट रस्ते इ. | प्रशस्त स्टेअरकेस लॉबी, पार्कींगसाठी मुबलक जागा, वसाहतीमध्ये बाग, पथ दिवे व कॉंक्रीट रस्ते इ. |
| ०६ | एका सदनिकेचा बिल्टअप एरीया | ८५.०० चौ.मी. | ५५.०४ चौ.मी. |
| ०७ | एका सदनिकेचा कारपेट एरीया | ६०.००चौ.मी. | ४०.६७ चौ.मी. |
| ०८ | एका सदनिकेची अंदाजित विक्री किंमत | रु.२२,९५,००० /- | रु.११,८८,००० /- |
| ०९ | अर्जासोबत भरावी लागणारी रक्कम (डीडी व्दारे) | रु.२५,०००/- | रु.१५,०००/- |
| १०. | डीडी व्दारे सदनिका ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणारी रक्कम (अर्जासोबत भरलेली रक्कम वगळून) | रु.२२,७०,०००/-<br>जास्तीत जास्त ९० दिवसांच्या कालावधीत तीन समान मासिक हप्त्यात | रु.११,७३,०००/-<br>जास्तीत जास्त ९० दिवसांच्या कालावधीत तीन समान मासिक हप्त्यात |
| ११. | अर्ज विक्री किंमत | रूपये १००/- | रूपये १००/- |
| १२. | अर्ज विक्री ठिकाण (कार्यालयीन वेळेप्रमाणे ) | **१**)योजनेच्या ठिकाणी - प्लॉट क्र.आर - ७,एम. आय़.डी.सी.वाळूज, औरंगाबाद.<br>**२**) औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यालय, गृहनिर्माण भवन,महावीर स्तंभा जवळ, सी. बी.एस.मार्ग, औरंगाबाद | **१**) योजनेच्या ठिकाणी - प्लॉट क्र.आर - १,एम. आय़.डी.सी.पैठण<br>**२**) औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यालय, गृहनिर्माण भवन,महावीर स्तंभा जवळ, सी.बी.एस.मार्ग, औरंगाबाद |
| १३. | अर्ज स्विकृतीचे ठिकाण (कार्यालयीन वेळेप्रमाणे ) | औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यालय, गृहनिर्माण भवन,महावीर स्तंभा जवळ, सी.बी.एस.मार्ग, औरंगाबाद | औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे कार्यालय, गृहनिर्माण भवन,महावीर स्तंभा जवळ, सी.बी.एस.मार्ग, औरंगाबाद |
| १४ | अर्ज विक्री व स्विकृतीचा कालावधी (कार्यालयीन वेळेप्रमाणे ) | दि. २१/०८/२०१४ ते संपूर्ण सदनिका वाटपापर्यंत | दि. २१/०८/२०१४ ते संपूर्ण सदनिका वाटपापर्यंत |
| १५ | अधिक माहितीकरीता संपर्क | रामदास गोराडे, सहा.अभियंता-९४२२७१२२५०,<br>गोरख अहिरे - ९०४९१३११९१,<br>राजेश हिंगमिरे- ७७९८७२२३३३,<br>सुरेश राऊत -९८९२६००६७१<br>विनय ठोंबरे - ९९२२९०१०८७ | पी.ए.सोनवणे,उप.अभि.- ९८८१५१०६४१,<br>धिरज सावजी ९५४५५७०१११,<br>नरेश गव्हाणे ९८२३९८११७७,<br>विलास जोशी -९४२३१५१६८५<br>विनय ठोंबरे - ९९२२९०१०८७ |

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद - ४३१००१
दुरध्वनी क्र.०२४०-२३३४०३५/२३५७२५९, फॅक्स - ०२४०-२३३२४३८, वेबसाईट www.mhada.maharashtra.gov.in

---

पैठण येथील योजनेसाठी बँक ऑफ महाराष्ट्र व वाळूज येथील योजनेसाठी यस बँक - डीएचएफएल, बँक ऑफ महाराष्ट्र, एस.बी.आय., स्टेट बँक ऑफ पटीयाला, बँक आफ बडोदा, सारस्वत बँक इ. बँकेकडून त्यांचे अटी व शर्तीस अधिन राहून कर्जपुरवठा उपलब्ध होऊ शकेल.

टिप : .

१. अर्जदाराचे वय अर्ज करते वेळी १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. तसेच तो भारताचा नागरीक असावा.
२. अनु. जाती, अनु.जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती या प्रवर्गातील अर्जदारांने जात व जातीचे वैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय अर्ज स्विकारला जाणार नाही.
३. सदर योजनेतील सदनिकांसाठी यापुर्वी अर्ज सादर केलेल्या गाळे धारकांनाही या जाहिरातीत नमुद केलेली किंमत लागू राहील.
४. सदनिकेचा ताबा घेण्यापुर्वी मा. मुद्रांक नियंत्रक व नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक : २७/१०/२००४ रोजीच्या परिपत्रकानुसार सदनिका ताब्यात घेण्यापुर्वी गाळयाच्या किंमतीवर विहीत दराने नियमानुसार मुद्रांक शुल्काचा भरणा करणे अर्जदारास बंधन कारक राहील.
५. सदनिकांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सदनिकांची विगतवारीत बदल होईल.
६. विहित नमुन्यातील छपाई अर्जाची किंमत रुपये १००/- आहे. अर्ज टपालाने अथवा कुरीअर सेवेद्वारे स्विकारले जाणार नाहीत.
७. पुर्ण भरलेले व आवश्यक रकमेचा डिमांड ड्राप्ट सोबत जोडलेले अर्जच स्विकारण्यात येतील डिमांड ड्राप्ट कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेचा असावा व तो "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, औरंगाबाद" या नावाने घेऊन औरंगाबाद शाखेवर देय असावा.
८. स्थानिक विकास नियंत्रण संस्था एम.आय.डी.सी. कडून वेळोवेळी आकारण्यात येणारा सेवाकर, मालमत्ता कर पाणीपट्टी, विद्युत देयके इ.तसेच अकृषिक कर व भुईभाडयाचा अर्जदारास प्रचलित नियमानुसार भरणा करावा लागेल.
९. ज्या अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्ज मागे घेऊन अर्जासोबत भरणा केलेली अनामत रक्कम परत मागितल्यास प्रशासकीय खर्चापोटी रुपये ५०००/- (पाच हजार रुपये) कपात करुन उर्वरित रक्कम परत करण्यात येईल तसेच अनामत रक्कम वा मंडळाकडे भरलेल्या अन्य कोणत्याही रक्कमेवर कसल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.
१०. सदनिका ताब्यात घेतल्यानंतर, वसाहतीतील सर्व सदनिकाधारकांना एकत्रीत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करावी लागेल व वसाहतीतील सामायिक रस्ते , पाणीपुरवठा लाईन, विद्युत दिवे व पंप, ड्रेनेज लाईन इ. ची दुरुस्ती - देखभाल गृहनिर्माण सहकारी संस्थेमार्फत परस्पर करावी लागेल. तसेच संस्थेस एम.आय.डी.सी. कडुन आकारण्यात येणारे पाणी देयके , सेवाकर इ.चा भरणा परस्पर करावा लागेल.
११. सदनिकाधारकांना सदनिकेत कोणताही बदल करण्याची परवानगी नसून तळमजल्यावरील सदनिकाधारकांनाही कोणतीही जागा व्यापता येणार नाही. अन्यथा, अनधिकृत फेरफार व बांधकामाच्या विरोधात रितसर कार्यवाही करण्यात येई
१२. योजनेतील प्रति सदनिका किंमत अंदाजित असून बांधकाम व विकास कामे पुर्ण झाल्यावर प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे योजनेतील सदनिकाची अंतिम विक्री किंमत काढण्यात येईल. त्यानुसार विक्री किंमतीत वाढ झाल्यास वाढीव रकमेचा भरणा करणे सदनिकाधारकावर बंधनकारक राहील.
१३. अर्ज स्विकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी राखून ठेवले आहेत.
१४. सदर सदनिकाची किंमत ही दि. ३०/११/२०१४ पर्यंत परीगणीत केलेली असून तदनंतर नियमाप्रमाणे व्याज भांडवलीकरणाची रक्कम अतिरीक्त भरावी लागेल.
१५. या माहिती पत्रकात दिलेला तपशील परिपूर्ण नाही. तो फक्त निर्देशक आहे. सदनिकांच्या वितरणाच्या व वाटपाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी पत्राव्दारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापक, गाळयाची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतुदी, अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

**Sd/-**
**मुख्य अधिकारी,**
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद.